वाचा २१६५
१७/७/८८

# दर्यावर्दी सिंदबाद

## आणि त्याच्या
## सात सफरी

(सफर दुसरी)

-: लेखक :-

म. ग्रं. सं. ... शाखा.
... के. बर्वे ...
क्र. २१६५ ता. १२/८/८८
BVBK-0402167

दिलीपराज प्रकाशन

८५२ व ९०९ रविवार पेठ, पुणे २.

किंमत एक रुपया फक्त.

प्रकाशक :
राजीव दत्तात्रय बर्वे
८५२ व ९०९ रविवार पेठ, पुणे २.

( सर्व हक्क प्रकाशकाधिन )

❊

नवीन अवृत्ती मार्च १९८६

❊

मुखपृष्ठ व चित्रभूषा :
श्री. रमेश भारताळ

❊

मुद्रक :
बा. ग. गायकवाड
शिवशक्ती मुद्रणालय
१३ । १४ नवा सदाशिव पेठ, पुणे ३०.
जोशी वाडा अलका टॉकीज जवळ.

... शाखा.
... दिनांक
२१६४ ... १५/४/६८
... कांपा ...

# दर्यावर्दी सिंदबाद
## सफर २ री

BVBK-0402167

आमच्या या दुसऱ्या जलप्रवासाची सुरुवात मोठी झकास झाली. वाटेत निरनिराळ्या बंदरावर आम्ही काही दिवस मुक्काम करीत व्यापार केला. मला व इतर व्यापाऱ्यांना भरपूर कमाई झाली.

आमच्या बोटीचे नांगर टाकले. किनाऱ्याशी बोट लागताच आम्ही खाली उतरलो. सर्वत्र हिरवीगार गर्द राई होती. पाहावे तिकडे झाडाझुडपांची नुसती गर्दी दिसली. भरपूर फळे झाडावर लटकत होती. फुले फुलली होती. पक्ष्यांची किलबिल कर्णमधुर वाटे. मधूनमधून स्फटिकासारखे निर्मळ पाण्याचे झरे झुळझुळ वाहात होते. नवल हे, की एवढ्या फळबागातील फळे खायला किंवा फुलांचा सुवास घ्यायला तेथे एकही माणूस दिसत नव्हता !

निसर्गाचे ते मोहक रूप पाहून माझे मन गहिवरले. व्यापारी व खलाशी इकडे तिकडे फिरावयास गेले. मी एकटाच बरोबर खाण्याचे जिन्नस घेऊन एका फळबागेत गर्द झोपडीत शिरलो. एका झाडाची मधुर फळे पोटभर खाल्ली पुढे एका झऱ्यासाठी झाडाच्या सावलीत बसून आरामशीरपणे फराळ केला. वाऱ्याची एक गारशी झुळुक आली. भरल्या पोटी थोडी सुस्ती आली म्हणून जरा आडवा झालो आणि मला नकळतच गाढ झोप लागली.

या सुखनिद्रेतून मला अचानक जाग आली. डोळे उघडून इकडे तिकडे नजर टाकली. जिकडे तिकडे सगळे सामसूम दिसत होते. मी दचकून उठलो. धावतच बंदरावर आलो. पहातो तो काय–मला एकटचालाच मागे सोडून जहाज निघून गेले होते.

मी कपाळावर हात बडवून घेतला, ‘आता आपली धडगत नाही. चांगले सुखात होतो. कोठून ही अवदसा सुचली ? आता पुढे काय करायचे, कोठे जायचे, कोठे राहायचे, काय खायचे-प्यायचे, काही काही सुचेना. काही डोकेच चालेना.

मागील खेपेस त्या निर्मनुष्य बेटावर तो घोडेवाला सौदागर अचानक भेटला. त्यामुळे सुखरुप बचावून माय-

देशी गेलो, पण असे सारखे पुन्हा कसे घडणार ? मी स्वतःवर चिडलो. संतापलो आणि दुःखाने रडलोही.

पण आशा वेडी असते. उगीच बसून राहाण्यापेक्षा मी वाट फुटेल तिकडे वेडावाकडा भटकत राहिलो. बराच वेळ भटकंती केली, पण कुठे काही माणसाचा ठावठिकाणा दिसत नव्हता. फक्त वर आकाश, खाली समुद्र– वाळू– झाडे– पक्षी याखेरीज काही नव्हते.

अखेर एका उंच झाडावर चढलो. माणूस– भेटीसाठी आसुसलेली माझी नजर मी सभोवार फिरवली, तेव्हा दूर अंतरावर एका ठिकाणी मला काहीतरी अर्ध गोलाकार पांढरे–शुभ्र असे काहीतरी दिसले.



झाडावरून उतरून मी तेथे धावतच गेलो. जवळ जाताच एक प्रचंड मोठा उंच असा गोलघुमट मला दिसला. मी

त्या गोला कार घुमटाला एक पूर्ण प्रदक्षिणा घातली त्याचा घेर जवळजवळ पन्नास पावले इतका भरला, पण आत जायला कोठेही दार किंवा एखादे लहानसे भोकही दिसत नव्हते.

मी तिथे बसून राहिलो. सूर्य मावळायची वेळ झाली. इतक्यात आकाश एकदम झाकोळले. वर आकाशात ढग दिसत नव्हता, मग असे एकदम अंधारल्यासारखे का व्हावे ? मी मान वर करून निरखून पाहिले, तो ढग नव्हता. आकाशातून एक प्रचंड पक्षी झपाट्याने खाली उतरत होता. त्याचा आकार आणि पंखे एवढी लांबरुंद होती की, साऱ्या बेटावर त्याच्या सावलीने अंधारून आले होते. हळूहळू तो पक्षी खाली उतरला व त्या पांढऱ्या घुमटावर बसला. तो घुमट म्हणजे त्या प्रचंड पक्ष्याचे अंडे होते. ते तो उबवू लागला. या पक्ष्याचे नाव ' रूख ' पक्षी असे होते. त्याच्याविषयी यात्रेकरू आणि प्रवासी यांचे-कडून मी ऐकले होते. त्याची मला यावेळी आठवण झाली.

हा पक्षी काही बेटावर राहतो, तेथे अंडी घालतो अंडी उबवून पिले बाहेर आली की, त्यांना हत्ती खायला घालतो, हे सर्व आठवले.

रात्र पडली. अंड्यावर बसलेल्या अजस्त्र रूख पक्ष्याने आपली पंखे जमिनीपर्यंत लांबवली. अंडे उबवता उबवता तो झोपी गेला.

मला एकदम एक धाडसी कल्पना सुचली. मी माझ्या डोक्याला बांधलेला भला मोठा फेटा काढला. त्या फेटयाचा पीळ करून त्याचा मजबूत दोरखंड बनविला. दोरखंडाचे एक टोक त्या पक्ष्याच्या पायाला बांधले. दुसरे माझ्या कमरेभोवती घट्ट गाठी मारून आवळून घेतले. पहाट झाली. 'रुख'ला जाग आली. त्याने मोठ्यांदा चीत्कार केला, मग भुर्रदिशी आकाशात झेप घेतली वायु-वेगाने तो खूप उंचावरून उडत उडत कितीतरी दूर गेला. मी मन घट्ट करून त्याच्या पायाशी एखाद्या शिकाळ्या-सारखा हेलकावे खात, तो नेईल तिकडे जात होतो. माझी चाहूल त्याला लागली असती, तर एखाद्या पेपरमिंटाच्या गोळीसारखे सहज त्यानें मला गिळून गट्ट केले असते.

पण सुदैवाने मी यातून बचावलो. रुख पक्षी खूप वेळाने विश्रांतीसाठी खाली उतरू लागला. खाली येत येत तो एका उंच पर्वताच्या शिखरावर येऊन बसला. क्षणाचाही विलंब न लावता मी स्वतःला सोडवून घेतले. त्याच्या

पायातून फेटा सोडवून घेतला, पण त्याची नजर मजवर पडण्याआधीच, मी तेथून धूम ठोकली.

जरा वेळाने तो रुख पक्षी पुन्हा आकाशात झेपावला. मी मान वर करून पाहिले. त्यावेळी त्याच्या पंजात एक लांबच लांब अक्राळविक्राळ साप मला दिसला. डोंगर-माथ्यावरच्या दरीतून साप पकडूनही महाप्रचंड स्वारी पिलांना 'खाऊ' घेऊन निघाली होती.

तो पक्षी आकाशात उंच जाऊन दिसेनासा झाला. तेव्हा मी माझ्या सभोवार नजर फिरवली. यावेळी एका ऊंच अशा पर्वताच्या शिखरावर मी होतो. समोरच एक खोल, लांबरुंद अशी दरी पसरली होती. दरीच्या सर्व बाजूंनी कमीअधिक उंचीच्या मोठाल्या पर्वतांच्या रांगा पसरल्या होत्या. झाड मुळीच नव्हते. त्या दुपारच्या रणरणीत उन्हात सगळे उजाड–ओसाड; राखमय वाटत होते. हे पाहून माझ्या छातीत धस्स झाले. एवढे विचित्र धाडस करून अखेर पुन्हा आपण आलो. एका निर्मनुष्य, ओसाड कडेकपाऱ्यात ! त्या बेटावर थांबलो असतो, तर खायला फळे आणि प्यायला पाणी तरी होते. पण इथे ना झाड ना झुडुप ! ना पाट, ना झरा ! तहान व

भूक भागवायची कशी नि जगायचे कसे ? स्वतःवरच मी चिडलो आणि म्हटले, ' मर बेटचा. महामूर्ख, भुकेने तड-फडत, पाणी, पाणी करून मर, अल्ला यावेळी तुला रहम करणार नाही. आगीतून निघून खाईत पडावे, असाच मूर्ख-पणा मी केला होता. याचे प्रायश्चित्त भोगलेच पाहिजे !

पण मनाचा धीर करून मी त्या दरीच्या कडेकडेने जाऊ लागलो. एकीकडे आकाशाला भिडणारे उंचच उंच पर्वतकडे, तर दुसरीकडे पाताळाइतके खोल अशी महाभयंकर दरी-मध्ये फक्त लहानशी पायवाट. मात्र इथली माती आणि रेती चकचकीत हिऱ्यांचे बनली आहे, लगेच माझ्या लक्षात आले. कडेकपाऱ्यातच हिऱ्यांचे ढीगच्या ढीग पसरले होते.

मी तसाच चालत राहिलो. लहान मोठ्या अनेक घळी-तून प्रचंड साप आणि फुरशी सळसळताना दिसली. माझ्या अंगाचा थरकाप उडाला. एकेक साप माडाएवढा लठ्ठ व लांबट होता. दिवसा रुख पक्ष्याच्या भयाने हे साप बाहेर येत नसत.

रात्र होऊ लागली, की ते भक्ष्य शोधायला बाहेर पडत. आता या सापापासून रक्षण करण्यासाठी मी एखादी गुहा

शोधू लागलो. अखेर एक गुहा मला दिसली. तिचे तोंड अगदी अरुंद होते.मी आत शिरलो व एक मोठा धोंडा सरकवून आत यायचे भोक बंद करून टाकले. आत अंधुकसा उजेड होता. इथे निवारा घेऊन मला रात्र काढायची होती. पण अरे बापरे ! एक मोठी सर्पीण त्या गुहेत आपली अंडी उबवीत बसली होती. तिला पाहून भीतीने माझे हातपाय लटपटू लागले. अल्लाचे नाव घेत सारी रात्र मी जागून काढली. भीतीमुळे तहानभुकेची आठवण नव्हती. सकाळीच गुहेच्या तोंडावरचा धोंडा दूर सारला. बाहेर आलो चांगले फटफटीत उजाडले होते पोटात भुकेने कावळे कलकलत होते. जाग्रणामुळे घेरी येत होती. चार पावले कशीतरी झुंकांडचा देत देत चाललो. तोच माझ्यापुढे एक मेलेला बकरा पडलेला दिसला. त्याचे कातडे सोललेले होते व आतील रक्त त्या लालसर कातडीवरून ठिबकत होते.

तो मारलेला बोकड कडयावरून कोणा व्यापाऱ्याने खाली दरीत लोटून दिला असला पाहिजे. मग मला आठवले, या प्रवासात पर्वतातील घळीतून आणि दऱ्यातून हिरे, माणके काढण्याची ही एक व्यापाऱ्यांची युक्ती आहे.

या ठिकाणी कोणाही व्यापाऱ्याला येता येणे जवळ जवळ अशक्य होते. इथे महाप्रचंड साप असल्याने कोणी व्यापारी इकडे येत नाही. शेळ्या, मेंढ्या, बकरी अशा पशूंच्या मांसाचे तुकडे व्यापारी खाली दरीत टकतात. त्या चिकट ओलसर अशा मांसखंडात दरीतले टोक दार हिरे खड्यासारखे रूतून बसतात. 'रूख,' 'गरूड' असे मोठाले पक्षी हे मांसाचे तुकडे खायला दरीत जातात. चोचीत ते तुकडे घेऊन ते उडत उडत पर्वत-कड्यावर येतात तेथे आरडाओरडा करून व्यापारी लोक पक्ष्यांना घाबरवतात. पक्षी मांसाचे तुकडे भीतीने टाकून देतात. व्यापारी ते गोळा करतात. त्याला चिकटून आलेले लाखो रुपयांचे हिरे या युक्तीने व्यापारी विनासायास मिळवतात.

समोर पडलेला रक्ताळलेला बोकड पाहून मला हे सगळे आठवले. मी मनाशी काही विचार केला आणि लगेच खाली वाकून हिरे गोळा करायला सुरुवात केली. सगळे खिसे भरून हिरे गोळा केले. शिवाय अंगावरची शाल, रूमाल वगैरेतून हिऱ्यांच्या पुरचुंड्या बांधून घेतल्या इतक्यात वरून धप्पकन् एक मोठा मांसाचा तुकडा खाली पडला. मी लगेच माझी पगडी छातीशी धरली. जमिनी-वर उताणा निजलो. तो मांसाचा तुकडा छातीवर ठेवून

दोन्ही हातांनी तो गच्च पकडला. अशाप्रकारे मी मांसा-आड दडलो.

दहापाच क्षणातच एका गरूडाने झेप टाकली, तो मांसाचा तुकडा आपल्या पंजात पकडला. मांसाच्या तुकड्याबरोबर मलाही घेऊन गरूड आकाशात उंच उडाला तो एका पर्वतशिखरावर उतरला. मांस फाडून खायला त्याने सुरूवात केली तोच व्यापाऱ्यांचे लोक फळकुटे वाजवीत, आरडाओरडा करीत तेथे आले. तेव्हा घाबरून गरूड उडून गेला. मी मांसाचा तुकडा छातीवरून दूर सारून चट्कन् उठलो. माझे कपडे रक्ताने लालेलाल झाले होते. गरूडावर ओरडणाऱ्या व्यापाऱ्याने मला पाहिले. तो गोंधळून तिथेच उभा राहिला. मग खाली पडलेला मांसाचा तुकडा त्याने उलटापालटा करून पुनः पुन्हा पाहिला. पण मांसाच्या तुकड्याला एकही हिरा चिकटला नाही, हे पाहून तो फार दुःखीकष्टी झाला. मला पाहून त्याने विचारले, 'कोण रे तू ? इथे कसा आलास ?'

मी माझी सर्व हकीकत सांगितली. माझ्यावर कोसळ-लेल्या संकटाचे वर्णन केल्यावर त्याचे मत माझ्याविषयी फार चांगले झाले. मी त्याला म्हटले, 'मित्रा, भिऊ

२३६० ... ९४।८९



नकोस. मीही तुझ्यासारखाच एक व्यापारी आहे. तुला तुझ्या मांसखंडात एकही हिरा मिळाला नाही, म्हणून दुःखी होऊ नकोस. मी भरपूर हिरे आणले आहेत. मी ते तुला देतो माझी खाण्यापिण्याची व्यवस्था कर.'

त्याने आनंदाने मला खाऊपिऊ घातले. त्याच्याबरोबर मी निघालो. आपल्या इतर व्यापारी मित्रांचीही त्याने मला ओळख करून दिली. रात्री त्या व्यापाऱ्यांच्या बरोबर गप्पागोष्टी करीत मी सुखाने झोपलो. 'माझ्या' मांसाच्या तुकड्याच्या मालकाल मी बरेचसे हिरे दिले व इतर व्यापाऱ्यानाही थोडेथोडे हिरे दिले. सकाळी त्या पर्वतराजीतून परतीची वाट काढीत आम्ही सर्वजण निघालो. वाटेत जागोजागी भलेमोठे नानारंगाचे साप आम्हाला दिसले.

जाता जाता आम्ही एका बेटावर आलो. या बेटावर कापडाच्या झाडांची बाग होती. एकेक झाड एवढे मोठे होते की, शंभर माणसे त्याच्या छायेत आरामशीरपणे

विसावा घेत असत. तेथे बरेचसे गेंडेही आम्हाला दिसले. प्रत्येक गेंडा अंगानेचांगला गरगरीत आणि उंटाहूनही उंच होता. हे गेंडे गाईम्हशीसारखे गवत व झाडपाल खात. त्याच्या कपाळावर एक प्रचंड व लांबचलांब शिंग असे. या शिंगाने तो हत्तीलाही उचलून आपटून मारतो. हत्ती मरतो त्याची शिंगाला लागलेली चरबी उन्हाने वितळते, ती ओघळून, गेंडयाच्या डोळयात झिरपते. यामूळे गेंडा आंधळा होतो. शिंगात रूतलेल्या हत्तीच्या धुडासह हा हा आंधळा गेंडा धडपडत समुद्राच्या किनाऱ्यावर जाऊन पडतो. तेथे रूख पक्षी त्यावर झडप घालून, गेंडयाच्या शिंगाला चिकटलेल्या हत्तीसह उचलून आकाशात उडून जातो. आपल्या पिलांना या हत्ती व गेंडयांचा खाऊ घालून तो ती पिले वाढवतो.

अशाप्रकारे अनेक विचित्र प्राणी व पक्षी पाहात पाहात आणि वाटेत लागलेल्या शहरात व्यापार करीत आम्ही आमच्या 'शांततेच्या माहेरघरी' म्हणजे बगदादला पोहोचलो.

माझ्या सख्यासोयऱ्यांना मी भरपूर पैसाअडका वाटला.

दानधर्म केला. मित्रांना मौल्यवान वस्तू भेट दिल्या. पूर्वीप्रमाणे पुन्हा ऐषआरामात माझे दिवस जाऊ लागले.

पण काय गंमत आहे पहा ! माणसाला चैनीची जशी चटक लागते, तशीच धाडसाचीही लागते. त्यामुळे पुन्हा घरी आरामशीर बसणे बरे वाटेना. मग मनाशी पुन्हा जलप्रवासाची योजना आखली. विक्रीच्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. ते सारे सामानसुमानाचे गठ्ठे घेऊन एके दिवशी बगदादहून निघालो आणि थेट बसरा बंदरावर येऊन थडकलो.

एक मोठे उमदे जहाज प्रवासाला निघायच्या तयारीत होते. या जहाजावरती खलाशी अगदी निष्णात होते. इतर व्यापारीही चांगले कुलीन, घरंदाज व प्रतिष्ठित असे होते. मनात अल्लाचे नामस्मरण करून आम्ही प्रवास सुरु केला. काही दिवस काहीही अडचण न येता, आमचा प्रवास सुरू झाला, पण अखेरपर्यंत असे कुठले सुरळीत पार पडायला !

मित्रांनो, माझ्या या तिसऱ्या समुद्रसफरीची हकीकत तर तुम्ही ऐकलेल्या पहिल्या दोन सफरीपेक्षाही अगदी

आणि मनाला विलक्षण चटका लावणारी आहे, पण आता रात्र बरीच झाली आहे, तेव्हा उद्या सकाळी इकडेच या, म्हणजे ती सारी विलक्षण हकीकत अगदी घडली, तशी सांगेन.'

❋ ❋ ❋

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. नं. 21560 दिनांक 7/8/68
विषय ... क्र. ........